जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2023
सकाळ



कोल्हापूर : कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. एस. व्ही. आणेकर, डॉ. बी. टी. साळोखे, प्रा. धाराशिवकर, सोबत डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. ए. एन. जाधव आदी.

# विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत कोरे अभियांत्रिकीचा प्रथम क्रमांक

वारणानगर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत वारणानगरच्या तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या होरायझन नियतकालिकेने व्यावसायिक महाविद्यालय गटात प्रथम क्रमांक पटकावला. या महाविद्यालयास सलग दुसऱ्या वर्षी हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. विविध विभागातून विद्यार्थ्यांनी वैयक्तिक २२ पारितोषिके पटकावली.

पारितोषिक वितरण समारंभ शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्र. कुलगुरू प्रा.डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यापीठ परीक्षा विभाग प्रमुख, डॉ. ए. एन. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितित पार पडला. शिवाजी विद्यापीठाच्या अनेक स्तुत्य उपक्रमका पैकी एक सर्वोत्तम उपक्रम आहे. या नियतकालिकांचे परीक्षण शिवाजी विद्यापीठाकडून नियुक्त प्रत्येक विभागासाठी वेगवेगळ्या तज्ञ परीक्षकांकडून केले जाते. पुरस्कार प्राचार्य. डॉ. एस. व्ही. आणेकर, उपसंपादक प्रा. ना. श्री. धाराशिवकर यांनी स्वीकारला. यावेळी प्रा. पी. व्ही. लोखंडे, डॉ. मार्क मोनिस, प्रा. ए. आर. चौगुले , प्रा. बी. ए. चौगुले, प्रा. एस. सविता उपस्थित होते. ह्या नियतकालिकाच्या निर्मितीप्रक्रियेसाठी

वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी, संपादक डॉ. बी. टी. साळोखे, प्राचार्य. डॉ. एस .व्ही. आणेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2023
पुढारी

# डॉ. प्रशांत अनभुले यांना महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस यांचे नामांकन



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. प्रशांत अनभुले यांना नुकतेच महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस यांचे नामांकन प्राप्त झाले आहे. तसा ईमेल त्यांना प्राप्त झाला आहे.

प्रा. अनभुले रसायनशास्त्र विभागात २००२ पासून कार्यरत आहेत. ते सेंद्रिय रसायनशास्त्रात संशोधन करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत १६ विद्यार्थ्यांनी पीएचडी प्राप्त केली आहे. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालकामध्ये १३० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहेत. त्यांना एक पेटंट मिळाले आहे. प्रा. अनभुले रसायनशास्त्र अधिविभागात अप्लाइड केमिस्ट्री विषयाचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. त्यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2023
पुढारी

# 'नेट परीक्षेला सामोरे जाताना आत्मविश्वास महत्त्वाचा'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत घेण्यात येणारी 'नेट' परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने सेट-नेट कार्यशाळेत ऑनलाईन पद्धतीने बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे उपस्थित होते. 'पेपर पहिला' यावर डॉ. पाटील यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, सेट-नेट परीक्षेसाठी यशाची पंचसूत्री आहे. त्यामध्ये अभ्यासक्रमाचे सुयोग्य आकलन, व्यापक व पुरेशा सातत्य पूर्ण सराव असणे महत्वाचे आहे. सुस्पष्ट व पुरेसे मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे आहे. योग्य संदर्भ ग्रंथांची निवड याबरोबरच प्रश्नपत्रिकेचे आकलन महत्त्वाचे आहे.

प्रा. डॉ. मोरे म्हणाले, कोणत्याही स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी



कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना डॉ. कृष्णा पाटील.

विद्यार्थ्यांची असली पाहिजे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी फायद्याचा आहे.

दुपारच्या सत्रात 'इतिहास' या विषयावर डॉ. दत्तात्रय मचाले यांनी तर 'इंग्रजी' या विषयावर डॉ. एस. बी. परीट यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी १७० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. डॉ. नितीन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. सुशांत माने यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2023
पुढारी

# रुकडी येथे शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनचे रविवारी अधिवेशन

रुकडी : शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनचे (सुयेक) ३४ वे वार्षिक अधिवेशन येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात रविवार, दि. १० डिसेंबर रोजी होणार आहे. या अधिवेशनात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील 'अर्थशास्त्र' विषयाचे २०० शिक्षक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात 'सेवा क्षेत्रांचे खासगीकरण', 'प्रदूषणाचे अर्थशास्त्र' या मुख्य विषयांवर दिवसभर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. या विषयास अनुसरून संशोधक, अभ्यासक निबंधाचे वाचन करणार आहेत. अधिवेशनाचे उद्घाटन खा. धैर्यशील माने यांच्या हस्ते, तर माजी खा. डॉ. निवेदिता माने यांच्या प्रमुख उपस्थितीत व अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. के. पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. समारोपप्रसंगी शिवाजी विद्यापीठातील 'मानव्यशास्त्र' विभागाचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील 'अर्थशास्त्र' विषयाच्या शिक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांतकुमार कांबळे, अधिवेशन समन्वयक डॉ. विजय देसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 DEC 2023
पुढारी

# 'स्क्रीप्ट टू स्क्रीन'वर शनिवारी शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन व पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने शनिवारी (दि. ९) चित्रपट विषयक एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे.

पुणे येथील प्रसिद्ध दिग्दर्शक आणि 'पडद्यामागची गोष्ट' पुस्तकाचे लेखक सुनिल नाईक 'स्क्रीप्ट टू स्क्रीन' या विषयावर कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीत सकाळी १०.३० वाजता कार्यशाळेचे उद्‌घाटन होईल. दुपारी ४.३० वाजता समारोप होईल. ही कार्यशाळा विनामूल्य असून सर्वांसाठी खुली आहे. कार्यशाळेत सहभागींना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी नाव नोंदणीसाठी https:// forms. gle/1 ydxCyceBtXh2 Cwy7 ही लिंक भरून सबमिट करावी.

अधिक माहितीसाठी पत्रकारिता अध्यासन तसेच मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधावा, असे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 DEC 2023
पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्रातील १२५ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १२५ अभ्यासक्रमांचे मंगळवारअखेर निकाल घोषित झाले आहेत.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी मास्टर ऑफ आटर्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, मास्टर ऑफ आटर्स, मास्टर ऑफ सोशल वर्क, बीएस्सी, एमएस्सी. (अर्थशास्त्र), बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग १३ अभ्यासक्रमांची परीक्षा झाल्या. परीक्षेला ६ हजार ८४३ विद्यार्थी बसले त्यामधील ३५३ विद्यार्थी गैरहजर होते. दि. ५ डिसेंबर रोजी एम.टेक. (वायसीएसआरडी) या अभ्यासक्रमाचा निकाल घोषित करण्यात आला.

0 6 DEC 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने रचला इतिहास

## पहिल्याच स्पर्धेत महिला संघाने २०८ गुणांसह पटकावले सर्वसाधारण विजेतेपद

प्रतिनिधी
कोल्हापूर

चंदीगड विद्यापीठ (चंदीगड) येथे झालेल्या पश्चिम-दक्षिण विभाग आंतरविद्यापीठ महिला कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने ताकतवर कामगिरी करुन दाखवत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. शिवाजी विद्यापीठाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरलेल्या या मोठ्या यशासाठी संघाने तब्बल २०८ गुणांची कमाई केली.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या वतीने विद्यापीठस्तरावर प्रथमच पश्चिम-दक्षिण विभाग आंतरविद्यापीठ महिला व पुरुष कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथमच शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने प्रतिनिधीत्व करताना ३ सुवर्ण, १ कांस्य जिंकत पदक सर्वसाधारण




चंदीगड : पश्चिम-दक्षिण विभाग आंतरविद्यापीठ महिला कुस्ती स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद खेचून आणलेल्या शिवाजी विद्यापीठ महिला संघाला चषक देऊन गौरवताना मान्यवर.

विजेतेपद खेचून आणले. तसेच ६ महिला मल्लांनी शानदार कुस्ती करुन दाखवत आपला दबदबा निर्माण केला. त्याची दखल घेऊन पदक प्राप्त महिला मल्लांसह ९ मल्लांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेबरोबर खेलो इंडिया आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या महिला मल्लांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक डॉ. विक्रम नांगरे-पाटील व दादासाहेब लवटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2023
लोकमत




तामिळनाडू येथे झालेल्या साउथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या योगासन संघाने सुवर्णपदक पटकाविले.

# शिवाजी विद्यापीठाच्या योगासन संघांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तामिळनाडू येथे झालेल्या साउथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या योगासन संघाने सुवर्णपदक तर मुलांच्या संघाने चतुर्थ-क्रमांक पटकाविले. या दोन्ही संघांची २५ ते २७ डिसेंबर दरम्यान भुवनेश्वर (ओडिशा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली.

या संघाचे मार्गदर्शक सुरेश धुरे तर संघ व्यवस्थापक म्हणून संग्रामसिंह मोरे काम पाहत आहेत. या संघास कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या.

0 6 DEC 2022 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या संघाची सुवर्ण भरारी

## पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धा : मुलांच्या संघाची चौथ्या स्थानावर झेप

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या यशस्वी क्रीडा परंपरेला अधिक वृद्धींगत करत विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने तामिळनाडू येथे झालेल्या पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक पटकावण्याची प्रशंसनीय कामगिरी केली. सुवर्ण पदकाला गवसणी घालताना मुलींच्या संघाने तब्बल १२२३ गुणांची कमाई केली. आंध्रप्रदेशातील राजीव गांधी तंत्रविद्या विद्यापीठने रौप्य व चैन्नईतील अण्णा विद्यापीठाने कांस्य पदक जिंकले. शिवाजी विद्यापीठाच्या मुलांच्या संघाला पदकाने भलेही हुलकावणी दिली असली तरी ११७३ गुणांसह चौथा क्रमांक खेचून आणण्यात यश आले आहे.




तामिळनाडूतील पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेत भरीव कामगिरी केलेल्या शिवाजी विद्यापीठांच्या मुली-मुलांच्या संघाला चषक देऊन गौरवले. संघासोबत व्यवस्थापक संग्रामसिंह मोरे व प्रशिक्षक प्रा. सुरेश धुरे.

स्पर्धेतील यशामुळे विद्यापीठाच्या मुलींसह मुलांच्या संघाचीही २५ ते २७ डिसेंबर या कालावधी भुवनेश्वर (ओडिशा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मुलींच्या संघात प्रज्ञा गायकवाड, सानिका जाधव, अक्षता भाईगडे, वैष्णवी हजारे, सन्मती पाटील व ऐश्वर्या पाटील तर मुलांच्या संघात ऋषिराज माने, चेतन महामुनी, समीर सनगर, अभिजीत सावंत, ओंकार सकट, घननील लोंढे यांचा समावेश आहे. त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के प्र-कुलगुरू डॉ प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक संग्रामसिंह मोरे, प्रशिक्षक प्रा. सुरेश धुरे यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2023
तरुण भारत




# विद्यापीठाच्या मुलांच्या लॉन टेनीस संघास सुवर्ण पदक

**कोल्हापूर :** मध्यप्रदेश येथे झालेल्या वेस्ट झोन आंतर विद्यापीठ लॉन टेनीस स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलांच्या संघाने सुवर्ण पदक पटकावत स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचावले. या संघाची निवड अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय लॉन टेनीस स्पर्धेसाठी झाली आहे. संघामध्ये संदेश कुरळे, प्रथमेश शिंदे, पार्थ पाटील, अंकित बठेजा, कपिल कडवेकर व सदर संघाचे मार्गदर्शक म्हणून मनाल देसाई तर संघ व्यवस्थापक म्हणून श्री डॉ आकाश बनसोडे काम पाहत आहेत. शिवाजीविद्यापीठचे कुलगुरू डॉ डी टी शिर्के प्र कुलगुरू मा. डॉ पी एस पाटील , कुलसचिव डॉ व्ही एन शिंदे तसेच क्रीडा संचालक डॉ शरद बनसोडे यांनी खेळाडूना मोलाचे मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2022
लोकमत

# संदेश कुरळे याची स्पर्धेसाठी निवड

गडहिंग्लज : येथील शिवराजचा



खेळाडू संदेश दत्तात्रय कुरळे याची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली. मध्य प्रदेश येथे झालेल्या वेस्ट झोन आंतरविद्यापीठ राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेमध्ये त्याने सुवर्णपदक पटकाविले. शिवाजी विद्यापीठाला सुवर्णपदक मिळवून देण्यात संदेशने उल्लेखनीय कामगिरी बजाविली. या स्पर्धेत ५ राज्यांनी भाग घेतला होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2023
पुण्यनगरी

# भाईगडे, हाजिरे यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**गडहिंग्लज :** येथील शिवराज महाविद्यालयाचे खेळाडू अक्षता प्रभाकर भाईगडे, वैष्णवी परशराम हाजिरे यांची भुवनेश्वरी (ओडिसा) येथे २५ ते २७ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे.



राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवड झालेल्या अक्षता व वैष्णवी.

नुकत्याच तामिळनाडू येथे पार पडलेल्या साऊथ-वेस्ट झोन आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने सुवर्णपदक पटकावले आहे. या स्पर्धेमध्ये अकरा राज्ये सहभागी झाली होती. शिवाजी विद्यापीठाला सुवर्णपदक मिळवून देण्यात महाविद्यालयाचे खेळाडू अक्षता भाईगडे, वैष्णवी हाजिरे यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या खेळाडूंना शिवराज विद्या संकुलचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिलराव कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन, तर क्रीडा विभागप्रमुख डॉ. राहुल मगदूम, प्रा. जयवंत पाटील, संदीप कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 DEC 2023
पुण्यनगरी

# राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेसाठी शिवराजच्या खेळाडूची निवड

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील शिवराज महाविद्यालयाचा खेळाडू संदेश कुरळे यांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. संदेशच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



नुकत्याच मध्य प्रदेश येथे पार पडलेल्या वेस्ट झोन आंतरविद्यापीठ राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाने सुवर्णपदक पटकावले आहे. शिवाजी विद्यापीठाला सुवर्णपदक मिळवून देण्यात महाविद्यालयाचा खेळाडू संदेश कुरळे यांनी उल्लेखनीय कामगिरी बजाविली आहे.

या स्पर्धेसाठी पाच राज्यांचा सहभाग होता. संदेशला शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन, तर क्रीडा विभागप्रमुख डॉ. राहुल मगदूम व प्रा. जयवंत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.